IMPACT FACTOR
5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*

ISSN
2455-4375

# करोना, लॉकडाउन काळातील माहिती व तंत्रज्ञाव्दारे ग्रंथालयीन माहिती सेवा

**प्रा. उमेश ज. गावंडे**
ग्रंथपाल, श्री. संत गजानन महाराज कला महाविद्यालय,
बोरगांव मंजू
umeshgawande2020@gmai.com
Mb.No.8411939295

---

**प्रस्तावना :**

ग्रंथालयाचा मुख्य उद्देश विद्यार्थी, वाचक,सेशोधक गरजूना आवश्यक ती माहिती कमी कलावधीत उपलब्ध करून देणे. पारंपारिक ग्रंथालये मधील साहीत्य हे मुद्रीत स्वरूपाचे असायचे आणि आधूनिक काळात ग्रंथालयातील साहीत्य हे पूर्ण डिजिटल स्वरूपात दिसून येत आहे. म्हणजेच संगणकीकृत ग्रंथालये, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये, आभासी ग्रंथालये आणि डिजिटल ग्रंथालय झाली आहेत. आणि ग्रंथालयाचा मुख्य उद्देश पूर्ण करत असताना आधूनिक काळात ग्रंथालयाचे स्वरूप संगणकीकृत होत आहे. तसेच वाचकाना कमीत कमी वेळेमध्ये आवश्यक ते वाचक साहीत्य उपलब्ध करूण देण्यासाठी आणि ज्ञानाचा आवाका वाढवण्याकरीता ग्रंथालय व्यवस्थापन व नियोजन संगणीकृत व डिजिटल स्वरूपात होत आहे. तसेच ICT च्या वापरामूळे कामकाजातील वेळ व श्रमाची बचत होत आहे. या तांत्रीक उपकरणाच्या वापरामूळे ग्रंथालयात सखोल व विशाल स्वरूपाची माहीतीचे जतन करूण ठेवणे शक्य झाले आहे. आणि जतन करूण ठेवलेली माहिती विद्यार्थी , वाचक, सेशोधक आणि गरजूना कमी वेळात उपलब्ध करूण देता येते व ICT च्या माध्यमातून वाचन साहीत्याची सुविधा ऑनलाईन दिली जात आहे.

३१ डिंसेबर २०१९ ला चीन मधल्या वूहान शहरामध्ये कोविड १९ म्हणजे कोरोना या नावाचा विषाणू सर्वप्रथम सापडला आणि याचा प्रभाव संपूर्ण जगावर झाला. ३ मार्च रोजी त्याचा पहिल रूग्ण करेळ मध्ये सापडला व ९ मार्च रोजी महाराष्ट्रातील पूणे येथे कोरोनाचा रूग्ण आढळला आणि याचा प्रादूर्भाव संपूर्ण भारतात नाहीतर जगात झपाट्याने वाढू लागला व भारतात २२ मार्च २०१९ पासून लॉकडाउन जाहीर केले.

सर्व शाळा, महाविद्यालये, ऑफीस बंदे झाली व परीक्षेच्या वेळी लाकडॉउन लागल्या मूळे विद्यार्थ्यांयाची गैरसोय होउ लागली म्हणजे प्रत्यक्षात वर्गात जाउन शिकवणे बंदे झाले आणि या मध्ये ग्रंथालयाची भूमिका फार मोठी म्हणजे ग्रंथालये आपल्या साधन संपत्तीतून ज्ञान पुरविण्याचे काम करत आहे. त्यामूळे एक मोठा प्रश्न निर्माण झाला तो म्हणजे विद्यार्थ्यांना ऑनलाईन सर्विस आणि रिसोर्सेस उपलब्ध करूण देण्याचा शिक्षण ही निरंतर चालनारि प्रक्रीया आहे. आज कोरोना महामारीमुळे शिक्षणप्रणालीच्या अखंड प्रणालीला मोठा बाधा पोहचला आहे. या कोरोणा महामारीमूळे हजारो शिक्षक आणि विद्यार्थी घरात बसून होते. अजूनही कार्यालये पूर्ण पणे सूरू झालेली नाहीत व घरात बसून विद्यार्थी , पालक, शिक्षनसंस्था ग्रासलेल्या होत्या आणि टि.व्ही व मोबाईल पासून लांब जायची ईच्छा होत होती घराबाहेर फिरता येत नव्हते अशा परिस्थितीत अनेकाना वाचनाचा खूप मोठा आधार वाटत होता.

महाविद्यालयीन ग्रंथपाल महाविद्यालयाच्या जीवनात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. म्हणजे शिक्षक व वाचक यांना असंख्य सेवा प्रदान करत असतात. या कोरोनापासून आपली मुक्तता होईल किंवा परिस्थितीत बदल होईल पण या काळामध्ये शिक्षणक्षेत्रात जे काही चागले बदल झाले. त्यापैकी एक महत्वाचा बद्दल म्हणजे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले. या संदर्भात विद्यापीठ अनूदान आयोग म्हणजेच (U.G.C) काही नविन नियमावली येणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी जारी केली आहेत. म्हणजेच २५% अभ्यासक्रम ऑनलाईन शिकवावा लागेल व विद्यापीठ स्वताहाचे ॲप्स तयार करावे. आणि महाराष्ट्र सरकारने १५% फि मध्ये सवलत सुध्दा देण्यात आली. नवीन शैक्षणिक वर्षामध्ये तंत्रज्ञांच्या समितीने ऑनलाईन शिक्षणाला जास्त महत्व दिले आणि सर्व महाविद्यालयाना आठवड्यातून साहा दिवस व्हर्च्यूअल क्लासरूम तयार करण्याचे सागितले. व आपापल्या महाविद्यालयात प्रार्चायाना लॉनलाईन अभ्यासक्रम आणि परिक्षा कशा घ्यायच्या याच्यावर चिंतन करून आपापल्या सोईनूसार लॉनलाईन अभ्यासक्रम कशा प्रकारे शिकवला गेला पाहिजे तसे वेळापत्रक तयार करूण zoom app, web

exam google meet, cisco अशाप्रकारे वेगवेगळे ॲप डॉउनलोड करूण आणि मुलाचे व्हॉटसप गृप तयार करूण त्याचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आले व ऑनलाईन वस्तूनिष्ट पेपर सूध्दा घेण्यात आले. व त्यातून या पध्दतीचे फायदे आणि तोटेही समजले.

**उद्देश :**

१) ग्रंथालयातील कर्मचाऱ्याच्या समक्ष एक मोठे आव्हाण होते की या महामारी मध्ये कसे ग्रंथालयीन सेवा दिली गेली पाहीजे.

२) निशुल्क wifi तथा hotspot स्थापित करण्यासाठी सरकार कडे प्रयत्न करणे.

३) कोविड १९ महामारीच्या परिस्थितीत ग्रंथलयीन कार्यप्रणाली वर विचार विणीमय करणे.

४) Online digital माध्यमातून सेवा पुरविणे.

५) Digital माध्यमात शैक्षणिक साधने जतन करणे.

६) कोरोना व्हायरसचे स्वरूप आणि वाचक वर्गाच्या समस्याचा अभ्यास करणे.

**ग्रंथालयासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि मार्गदर्शन तत्वे :**

ग्रंथालयांना लॉकडाउन मध्ये अनेक आव्हाणे आणि बंधनाचा सामना करावा लागला आहे. सरकारणे कोरोणाचा प्रभाव पाहता विविध पध्दतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवित होती. आणि सरकारी आदेशाने महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वेळा बदलत होत्या कधी ग्रंथालये बंद ठेवावे लागत होते आणि वेळा सुध्दा कमी करावी लागत होती. अशा गंभीर परिस्थिती मध्ये कोविड १९ चा प्रसार रोखण्यासाठी खालील प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब केला होता.

१. योग्य सॅनिटायझरचा वारंवार वापर करणे.
२ तूम्ही आजारी असाल तर घरी राहणे.
३ पुस्तकाची देवाण घेवाण करत असताना सुरक्षीत अंतर ठेवणे.
४ पुस्तकाची देवाण घेवाण करताना ४८ तासांसाठी पुस्तके वेगळ्या ठिकाणी ठेवली पाहिजेत.
५ वाचण कक्षात वाचकाची संख्या मर्यादित ठेवणे.
६ ग्रंथालयात प्रवेश करतात मास्क किंवा रूमाल बाधल्या शिवाय प्रवेश करणे बंधनकारक होते.
७ ग्रंथालयातील संगणक, दरवाजे, खिडक्या आणि जामणे स्वच्छ ठेवणे गरजेचे होते.
८ ज्ञान/ माहिती शेअर करण्यासाठी ऑनलाईन प्लॅटफार्म किंवा सोशल मिडियाचा वापर करावा.
९ नियतकालीडे आणि वर्तमानपत्रा सारख्या वारमवार वापरल्या जाणा—या वस्तूसाठी हातमोजे आणि मास्क उपलब्ध करून दिली पाहिजे.
१० आरोग्य चागले राहण्यासाठी स्वच्छतेचे पालन करणे जरूरीचे होते.

**कोविड १९ मध्ये ग्रंथालयात तात्रिक पध्दतीच्या माहिती सेवाची भूमिका :**

कोरोना व्हायरस हा मानवी आरोग्यावर विघातक परिणाम करणारा आहे. कोरोना माहामारीमूळे अनेक व्यक्तीचे बळी गेली तर घरे उदवस्त झाली मूले अनाथ झाली आणि अनेक व्यक्तीला अपगत्व आले. या कोरोणा माहामारीचे निर्मूलन करण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र सरकारने जनता संचार (Lock down) बंदी केली. व संचार बंदीमूळे शांत महाविद्यालय, विद्यापीठ, आणि बाजार पेढा बंद झाल्या. व त्यामूळे वाचक वार्गाच्या विविध समस्था निर्माण झाल्यात. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ICT हे माध्यम प्रभावी ठरले. आधूनिक ग्रंथालय म्हणजे वाचकाना कमीत कमी वेळात जास्तीत जास्त वाचन साहित्याची सेवा प्रदान करूण देणे होय. हे २१ त्या शतकात ग्रंथालये संगणकीकृत झाल्यामूळे शक्य झाले आहे. संगणकीकृत ग्रंथालय ICT च्या माध्यामातून ग्रंथालय कार्यज्ञान, सेमीनार, कॉन्फरन्स, ग्रंथ प्रकाशन कार्यक्रम, ग्रंथ व वाचन साहित्याची खरेदी विक्री, ग्रंथालय अंतर्गत वेब NDL online ग्रंथलय, ग्रंथ व माहितीची संकेत स्थळे इत्यादी कार्यक्रम संगनकाच्या माध्यमातून राबविली जात आहे. ग्रंथालयाने विविध माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमांचा अवलंब प्रामुख्याने कोरोना जनसंचार बंदी या कालावधीत मध्ये केलेला दिसून येतो. ग्रंथालयाने कोरोना माहामारीत संचार बंदीच्या काळात तांत्रिक पध्दतीने दिलेली माहिती सेवा खालील प्रमाणे.

**१) E-News paper :**

कोविड १९ माहामारी च्या बिकट परिस्थिती मध्ये दैनिक वर्तमानपत्र सुध्दा कोणी वाचत नव्हते आणि महाविद्यालया मध्ये वर्तमानपत्र घेत नव्हती अशा वेळी वर्तमान पत्राची PDF फॉईल पाठवायला सुरवात केली आणि काही वर्तमान पत्र online link देउ लागले. आणि महाविद्यालय ग्रंथालये whatsup ग्रूप व सेवा देउन विद्यार्थांना आणि वाचकाला याचा फायदा झाला.

**२) E-books :**

मोठमोठ्या प्रकाशनाने या महामारीच्या परिस्थिती मध्ये निवडक E-books नि:शुल्क आपल्या website वर देउ लागले आणि महाविद्यालयीन ग्रंथालय वाचकाना E-booksची link किंवा PDF फॉईल whatsup ग्रूप वर सेवा देण्यात येउ लागली.

**३) ग्रंथालय वेबसाईड :**

ग्रंथालयात कोरोना काळात जनसंचार बंदी व online शिक्षण पध्दती कालावधी मध्ये विद्यार्थी , शिक्षक, अध्यापक, वाचक व गरजू व्यक्तीकरीता महाविद्यालयीन ग्रंथालयानी स्वतंत्र वेबसाईट सुरू करूण येणा—या वाचक वर्गाला घर बसल्या वाचन साहित्याची सुविधा निर्माण करूण दिली. ग्रंथालयाने आपल्या वेबसाईडवर क्रमीक पुस्तके, संदर्भग्रंथ, वाचन साहित्याची सुविधा करूण दिली. यामूळे वाचकानी आपल्या गरजेनूसार वेबसाईटचा वापर करूण आवश्यक साहित्याची गरजा पूर्ण करून घेतली.

**४) ईमेल :**

ग्रंथालये नोंद असलेल्या वाचक वर्गाचे इमेले घेतलेले असतात हे सर्व इमेल सगणकावर किंवा मोबाईलवर सेव करूण ठेवले असतात व कोरोना माहामारी च्या वेळेला जी जनसंचार बंदी मध्ये वाचकाना सेवा देण्यासाठी ईमेल चा मोठा फायदा झाला व या ईमेल वर ग्रंथालयाने वाचकाच्या गरजा लक्षात घेउन संगणकाव्दारे ईमेलवर वार्ता तसेच वाचक साहित्य,कया कांदबरी व वर्तमानपत्रे वाचकाच्या ईमेल वर पाठवली व ईमेलवर पाठविलेल्या माहीती मुळे वाचकांना मोठा फायदा झाला.

**५) मोबाईल :**

कोरोना माहामारीच्या कालावधी मध्ये ग्रंथालयीन कर्मचा—यांनी मोबाईलवर नंबरवर वाचन साहीत्याच्या वेबसाइड व सांकेतीक स्थळाचे मैसेज पाठवून वाचकांना वाचन साहीत्य संबंधीची माहिती उपलब्ध करूण दिली. व वाचन साहीत्याच्या व्हिडीओ फिती ही मोबाईल वर पाठवली व अशा परिस्थिती मध्ये वाचकाना याचा मोठा लाभ मिळाला.

**६) फेसबूक :**

म्हाविद्यालयीन ग्रंथालयाने कोरोना माहामारी जनसंचार बंदी असताना वाचकान फेसबूक खाते तयार करूण फेसबूक संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे इत्यादी वाचन साहीत्य अपलोड करून दिले व वाचकाकरीता फेसबूकवर वाचन साहित्याने व्हीडीओ अपलोड केले. अशाप्रकारे फेसबूकवर माहिती टाकल्यामूळे वाचकान यांचा फायदा झाला. व ग्रंथालयाने फेसबूकवर टाकलेल्या वाचन साहित्यामूळे दैनदिन सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैद्यकीय व जगातील माहिती नागरीकांना घरबसल्या सहज प्राप्त होत होती आणि वेळ निघूण जात होता आणि मनोरंजन सुध्दा होत होते.

**७) व्हॉटसप :**

व्हॉटसप हे आधूनिक काळातिल माहिती प्रसारीत करणारे गतिशिल ॲप आहे आणि प्रत्येकाकडे ॲन्डराईट मोबाईल असल्यामूळे प्रत्येकाचे मोबाईल मध्ये हे ॲप डाउनलोड केलेले आहे. हे ॲप सरळ आणि सोप्या पध्दतीने वापरता येत असून वापरण्याकरीता व्हॉटसप ॲपवर खाते खोलून आपल्या अनेक व्यक्तीचे मोबाईल नंबरचा गट तयार करावा लागतो. आणि यामध्ये मध्ये फोटो, व्हीडीओ पाठवता येउ शकतो.

ग्रंथालयाने व्हॉटसप ॲप व्दारे शिक्षक, विद्यार्थी, व प्राध्यापक संशोधक आणि येणार वाचक यांचा ग्रूप तयार केला आहेत. या माहामारीच्या काळात जनसंचार बंदी असताना ग्रंथालयाने व्हॉटसप चा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. आणि या ॲप व्दारे ग्रूपवर संदर्भ ग्रंथाची यादी, E-book, धार्मिक ग्रंथ, वर्तमान पत्र आशा सर्व माहिती संबंधी व्हॉटसप ग्रूप वर link दिल्यामूळे कोरोना काळात वाचक व अभ्यासक याची गैससोय झाली नाही. त्यांना वाचन सुविधा वेळेवर उपलब्ध करूण

देण्याचे कार्य या व्हॉटसप व्दारे करण्यात आले.

**८) युट्यूब :**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील माहिती प्रसारीत करणारे युट्यूब हे एक प्रभावी ॲप आहे. युट्यूब वर मोठ्या प्रमाणात माहिती प्रसारित करू शकतो. वाचकान ज्या माहिती गरज असेल ति माहिती युट्यूब वर सहज मिळू शकते. ही माहिती मिळवण्यासाठी हे ॲप मोबाईलवर डाउणलोड करावे लागते. या युट्यूबचा वापर ग्रंथालयांनी कोरोना कालावधी मध्ये वाचकांना वाचन साहित्याची सुविधा पुरवण्याकरीता मोठ्या प्रमानात केला या युट्यूबवर शिक्षक व प्राध्यापकांनी शिक्षणा संबंधी आपले व्हीडीओ अपलोड केले तसेच कथा कादंब—या वृत्तपत्रातील महत्वपूर्ण बातम्या आणि वाचण साहीत्य प्रकाशित केले. याचा वाचकाना मोठ्या प्रमाणात या सुविधेचा फायदा घेता आला.

**निष्कर्ष :**

या कोरोना महामारीच्या काळा मध्ये माहिती तंत्रज्ञानाचा मोठा फायदा घेता आला. तसेच माहिती व वाचन साहित्याची सुविधा वाचकांना देण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला आहे. कोविड १९ साथीच्या प्रादूर्भावामूळे ग्रंथालयीन सेवेमध्ये अमूलाग्र बदल करावे लागले. कडक लॉकडाउन आणि सामाजिक अंतर नाईलाजाने समाजाला लावून घ्यावे लागले. इंटरनेट आणि वेब तंत्रज्ञानाने एक नवीन आणि अतुलनीय कामगिरी केली. ऑनलाईन शिक्षण पध्दतीने समोर जाताना यातील प्रत्येक घटकावर सखोल विचार होणे आणि त्यातील समस्या दूर करणे. हे एक मोठे आव्हान भारतीय शिक्षण पध्दतीसमोर होते. या सर्व घटकाचा अभ्यास करूण शेवटी जगावे या महामारीवर आणि शिक्षण पध्दती मोठा बदल घडून विजय मिळवला असे म्हणयला हरकत नाही.

**संदर्भ :**


- घाटोळे रा.ना. संशोधन पध्दती व तत्वे, श्रीमंगेश प्रकाशष, नागपूर २००५
- काचोळे दा.घो. सामाजिक संशोधक पध्दती, कैलास पब्लीकेशन, औरगांबाद २००६.
- Candy, p,c. (2002) Lifeling learning & Information Literacy. http://www.nclls.gov/libinter/Infolitc- on fmeet.
- Rocial Equity Tools. (2020) covid-19-Racial equity social justice resources-center For-Assessment & policy.
- Cithub.(2020).covid-19 database, Github, Retrieved April 23, 2022 from https://github.com / database/covid-19.
- World Health organization (2020) Infographics. Retrived April 23, 2022 from https://www.who.int/west-ernpacific/news/multimedia/infographics/covid-19.